**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**

**मागणी आधारित व समूहसहभागाच्या धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु १००५/प्र.क्र.६०/पापु ०७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक- ११ एप्रिल २००५**

**वाचा:** (१) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र. ग्रापापु १०९९/ प्र.क्र. ३२८/पापु ०७, दिनांक २७ जुलै, २०००.
(२) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र. ग्रापापु १००१/प्र.क्र. १९०/पापु ०७ ,दिनांक ३ सप्टेंबर,२००१.

**शासन निर्णय :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी मागणी आधारित, समूहसहभागाचे धोरण संदर्भिय क्र.१ येथील दिनांक २७.७.२००० च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू करण्यात आले असून, या धोरणाच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना संदर्भिय क्र.२ येथील दिनांक ३.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

२. या धोरणानुसार योजनेची निवड करणे, निवड केलेल्या योजनेची प्राकलने, आराखडे व अंदाजपत्रक तयार करणे, योजनेची अंमलबजावणी करणे, इत्यादि कामे संबंधित गावाने निवडलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावयाची आहेत. त्यानुसार योजनेची प्राकलने, आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेतल्यानंतर प्रत्यक्ष योजनेची अंमलबजावणी ग्रामस्तरावर ग्रामपंचायतींच्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने** करावयाची आहे. त्यानुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने योजनेचे काम करताना **कामाच्या दर्जात/गुणवत्तेत** कोणतीही तडजोड न करता अंदाजपत्रकात नमूद सर्व कामे योग्यरित्या केल्यावर अंदाजपत्रकातील रक्कमेपेक्षा कमी खर्चात ग्रामस्थांच्या एकीमुळे काम करुन घेतल्याने खर्चात झालेल्या बचतीची रक्कम संबंधित गावाने ठेवून घेण्यास शासन मंजुरी देत आहे. मात्र सदर बचत झालेली रक्कम गावातील नळ पाणी पुरवठा योजनेच्या भविष्यातील देखभाल व दुरुस्तीसाठी वापरता येईल. सदर रक्कम संबंधित गावाने त्याच कारणासाठी वापरावी. ही रक्कम इतर कामांसाठी ग्रामपंचायतीला वळती करता येणार नाही. इतर कामासाठी वापरल्यास तो ग्रामपंचायत व शासन निधीचा अपहार म्हणून गृहीत धरुन कारवाई करण्यात येईल.



606

३.	अशी रक्कम संबंधित गावास देण्यापूर्वी त्यांनी तयार केलेले अंदाजपत्रक हे योग्य आहे किंवा कसे व त्यात कोणतीही अनावश्यक, खर्चिक बाब अंतर्भूत नाही व विहित पध्दतीने ठरविलेल्या दराप्रमाणेच अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, याची जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी तपासणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
४. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
६. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
८. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
९. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
१०. गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद (सर्व)
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
१४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१५. उप अभियंता, यांत्रिकी उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१६. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
१७. निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.



७८